स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :-३० जून, २०२३

जळगाव दि.३० (प्रतिनिधी): गुंतवणूकीच्या काही मार्गांमध्ये जोखीम असली तरी उत्पन्न वाढीसाठी गुंतवणूक करणे आवश्यक असल्याचे मत सीए नितीन झंवर यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत बोलतांना व्यक्त केले.

बुधवार, दि.२८ जून रोजी गुंतवणूकीच्या विविध संधी या आशयाची कार्यशाळा विद्यापीठात घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. गुंतवणूकीचे महत्व समजावून सांगितले. मुदत ठेव, विमा, रिकरींग डीपॉझीट, सोने-चांदी खरेदी, शेत, जमीन, घर, दुकान, फ्लॅट, शेअर मार्केट, बॉन्ड, कर्जरोखे, वैद्यकीय विमा, म्युच्युअल फंड इत्यादी बाबत सविस्तर माहिती त्यांनी दिली. गुंतवणूकीचे विविध फायदे देखील त्यांनी विशद केले. प्रास्ताविक वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील यांनी केले. आभार उपवित्त व लेखा अधिकारी एस.आर.गोहील यांनी मानले. विद्यापीठाच्या वित्त विभागातील व इतर विभागातील कर्मचारी या कार्यशाळेत उपस्थित होते.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी